Website वर खुली जाहिरात देण्यासाठी सविस्तर मसुदा

तात्काळ

जा.क्र.स्वारातीग्राशावैमअं/भांडार/10904 /२०२०
स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय, अंबाजोगाई. जि.बीड
दिनांक - 31 /१२/२०२०

To,

M/S --------------------------------

**विषय - संस्थेच्या अधिष्ठाता यांच्या वापराकरिता INNOVA Car भाडयाने घेण्यासाठी दरपत्रके मागविणे बाबत.......**

संदर्भ - १. सामान्य प्रशासन विभाग यांचे शा.नि.क्र.:शापसे-३४२०/प्र.क्र.५४/का.३१ दि.१० ऑगस्ट २०२०

२. क्र.संवैशिवसं/परिवहन नोंदणी/भाडयाचे वाहन/परिपत्रक/७१३६/१-म दि. ०५ जुन २०१७

३.या कार्यालयाने संचालनालयास मागणी केलेले परवानगी पत्र क्र.६६३९ दि.१४.०९.२०२०

४. या कार्यालयाची मंजुर कार्यालयीन टिप्पनी दि. १५.०९.२०२०

उपरोक्त संदर्भांकित विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मा. अधिष्ठाता, स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई यांच्या करिता INNOVA Car (डिजल) हे वाहन भाडेतत्वावर मागविण्याकरिता संदर्भ क्र. १ मधील दरानुसार व संदर्भ क्र. २ अन्वये परिवहन संवर्गात नोंदणी झालेले वाहन भाडे तत्वावर घेण्याकरिता संदर्भ क्र. ३ नुसार मा. संचालनालया कडून प्राप्त होणा-या परवानगीच्या अधिन राहुन सोबत जोडलेल्या अटी व शर्तीनुसार (दरपत्रक) आपल्या संस्थेच्या/फर्मच्या नावाने दि. 06 /०१/२०२१ पर्यंत सिलबंद लिफाफे मागविण्यात येत आहेत.

त्या अनुषंगाने विहीत वेळेत प्राप्त झालेली दरपत्रके महाविद्यालयाच्या बैठक कक्षामध्ये वाहन विभाग समितीच्या समक्ष दि. 07 /०१/२०२१ रोजी ठिक . 12:00. वाजता उघडण्यात येतील.

## अटी व शर्ती

१. वाहन भाडयाने पुरविण्याची दरपत्रके सिलबंद असावी.

२. सिलबंद दरपत्रके विहित वेळेत स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई येथे प्रत्यक्षरित्या आवक विभागास सादर करावीत. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

३. दरपत्रके दोन लिफाफा पध्दतीने वेगवेगळया लिफाफामध्ये सादर करावीत.

अ) **लिफाफा क्र. १ मध्ये खालील कागदपत्रे असावीत.**

१. स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई यांचे नांवे बयाना रक्कम रु. १०,०००/- चा डिमांड ड्राफ.

२. वाहन नोंदणी प्रमाणपत्राची छायांकीत प्रत.

३. १९४ अ अन्वये वाहनास प्रवासी वाहतुक असल्याचा परवाना

४. विमा उतरविल्याची कागदपत्रे

५. वाहनाचा रोड टॅक्स अद्यावत भरल्याची पावती

६. अटी व शर्ती मान्य असलेबाबत स्वाक्षरी सादर करावे

७. प्रदुषण प्रमाणपत्र आवश्यक आहे. तसेच क्र. १ ते ७ मधील कागदपत्रे निविदाधारकांने छायांकीत व प्रमाणित केलेली असणे आवश्यक आहे.

ब) **लिफाफा क्र. २ मध्ये खालील कागदपत्रे असावीत.**

१. निविदा दरपत्रके (सोबत दिलेला व्यापारी लिफाफा मध्ये दिले नुसार)

क) **सदरचे दोन्ही लिफाफे तिस-या मोठया लिफाफा मध्ये घालुन लिफाफाच्या खालील डाव्या बाजुच्य कोप-यात पुरवठादाराचे संपुर्ण नांव व प-ता सुस्पष्ट लिहावा. निविदाचे लिफाफावर वाहन भाडयाने लावणे बाबत स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई असे स्पष्ट नमुद करावे.**

४. लिफाफा क्र. १ प्रथम उघडला जाईल त्यातील सर्व कागदपत्रांची पुर्तता करणा-या पुरवठादारांचाच लिफाफा क्र. २ उघडण्यात येईल.

५. निविदेतील देकार विना अट असावा देकारातील कोणत्याही अटी स्विकारल्या जाणारा नाहीत.

६. कागदरत्रांमध्ये खाडाखोड असु नये. अपरिहार्य कारणामुळे खाडाखोड करावी लागल्यास खाडाखोड ठिकाणी स्वाक्षरी करावी.

७. निविदा दरपत्रकाशिवाय इतर कोणत्याही कागदपत्रावर नमुद केलेल्या दराचा विचार केला जाणार नाही. अटी व शर्ती मान्य असल्यासबाबत स्वाक्षरीसह सादर करावे.

८. दरपत्रक मंजुर झाल्यापासुन तीन दिवसाच्या आत रक्कम रु. १००/- च्या मुद्रांकपत्रावर दरपत्रक मंजुरीच्या दिनांकापासुन ११ महिन्याच्या कालवधीसाठी वाहन पुरविण्यास तयार असल्याचा करारनामा करुन दयावा लागेल. सदर करारनामा हा करार केल्या पासुन ११ महिन्यापर्यंत लागु राहिल व त्यावरील अटी व शर्ती त्या काळात बंधनकारक राहतील.

९. मुळ दरपत्रक किंमतीच्या पाच टक्के सुरक्षा रक्कम निविदा मंजुरी नंतर ३ दिवसांत करारनामा कराताना स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई यांचे नावे डिमांड ड्राप करावा.

१०. वाहन भाडयाने घेतल्यानंतर आवश्यक ते सर्व कर कपात केले जातील. पुरवदाराने देयके सादर करतांना पॅन कार्डसह सादर करावीत.

११. वाहन वापरात असतांना प्रवासा दरम्यान विविध ठिकाणी देय असणारे पथकर (टोल) प्रथमत: वाहन मालकाने भरावी लागेल व त्याचा पावत्या सादर केल्यानंतर रक्कम अदा करण्यात येईल.

१२. फिरत्या दौ-याच्या वेळी वाहनाची नोंदणी प्रत, वाहनाचा वाहतुक परवाना, वाहनाचा विमा उतरविल्याची कागदपत्रे, वाहनचालकाचा मुळ परवाना, या कार्यालयाचे वाहन पुरवठा आदेश वाहनासोबत ठेवण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील.

१३. भाडयाचे वाहन मुख्यालयाच्या ठिकाणी २४ तास वाहनचालकासह उपलब्ध असावे.

१४. पुरविण्यात येणारे INNOVA Car हे वाहन नजिकच्या काळात नवीन खरेदी करण्यात आलेले असावे . त्याबाबत या कार्यालयाचे पत्र प्राप्त झाल्यानंतर सेवाअभियंता आरोग्य विभाग (परिवहन) यांचेकडून तपासणी करुन घ्यावी लागेल. तपासणी अहवाला नंतरच या कार्यालयाकडून आदेश देण्यात येतील. वाहन नादुरुस्त झाल्यास सर्व प्रकारची दुरुस्ती ही वाहन मालकाची जबाबदारी राहील. वाहनाच्या अपघाताची व वाहन सुरक्षिततेची संपुर्ण जबाबदारी वाहन चालक/मालक यांचेवर राहील.

१५. इंधन, वंगन, दुरुस्ती व वाहनचालकाचा पगार खर्च वाहनमालक यांनी करावयाचा आहे. वाहनचालकाकडे कायमस्वरुपी वाहन चालवण्याचा परवाना असणे आवश्यक आहे.

१६. वाहन उपलब्धते बाबत किमान तीन दिवस अगोदर कार्यालयास लेखी सुचना देणे बंधनकारक राहील. तसेच सदरच्या काळात त्याच क्षमतेचे पर्यायी वाहन उपलब्ध करुन दयावे लागेल विना सुचना वाहन उपलब्ध नसलयास प्रतिदिन रक्कम रु. १०००/- चा दंड आकारण्यात येवुन तो देयकातुन वसुल करण्यात येईल. तसेच त्यादिवसाचे वाहनाचे भाडे

देण्यात येणार नाही. कार्यालया मार्फत दुस-या पर्यायी वाहनाची व्यवस्था केल्यास सदरच्या वाहनाचे भाडे मक्तेदाराच्या देयक रकमेतुन वसुल करण्यात येईल. वाहन अनुउपलब्धतेमुळे/खराब वाहनामुळे वैद्यकीय कामात अडथळा निर्माण झाल्यास पुरवठादारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. वाहन हे नेहमी अधिष्ठाता यांच्या निवासस्थानी २४ तास ठवणे बंधनकारक राहील. अधिष्ठाता यांच्या पुर्व परवानगी शिवाय वाहन चालक व वाहन इतरत्र घेऊन जाता येणार नाही.

१७. वाहन वापरावयाच्या कालावधीमध्ये झालेल्या अपघातास व अनुषंगीक (जीवीत व मालम-ता हानीस) हे कार्यालय कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही त्याची सर्वस्वी जबाबदारी वाहन मालकाची राहील. तसेच सर्व प्रकारची होणारी नुकसान भरपाई वाहन मालकास दयावी लागेल.

१८. निविदेच्या अटी व शर्तीमध्ये बदल करणे प्राप्त निविदा/दरपत्रकांपैकी एक किंवा सर्व निविदा/दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणे याचा अधिकार स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई यांनी राखुन ठेवला असुन त्या विरोधात न्यायालयात जाता येणार नाही.

१९. पुरवठादाराने विहीत मुदतीत करार न केल्यास, करार केल्यानंतर वाहन पुरवठा न केल्यास बयाना रक्कम जप्त करुन त्याचे दरपत्रक रद्द करण्यात येईल व अशा पुरवठादारास काळया यादी टाकण्यात येईल.

२०. मुदतीच्या आत करार रद्द करावयाचा झाल्यास किमान ६०१ दिवस अगोदर पुर्व सुचना देणे आवश्यक राहील. नमुद सर्व सुचनेशिवाय वाहन पुरवठा करण्यास हयगय केल्यास सुरक्षा रक्कम व बयाना रक्कम जप्त करण्यात येईल.

२१. सद्य:स्थितीत नव्याने खरेदी करण्यात आलेल्या INNOVA डिजल वाहनधारकांनीच दरपत्रके सादर करावीत.

22. एकापेक्षा जास्त दरपत्रकधारक INNOVA डिजल या वाहनासाठी भाग घेतल्यास व त्यात दर समान असल्यास Letest Model ला प्राधान्य देण्यात येईल.

अधिष्ठाता
स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय
वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई.

सदरच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

निविदाधारकाची स्वाक्षरी

नाव :- . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

प-ता:- . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

स्थळ :- . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

दिनांक :-. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .